


RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७२ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.३ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ‘असा कोणताच प्रस्ताव नाही, त्या फक्त अफवा’ पेट्रोल-डिझेलच्या किमतीबाबत सरकारची स्पष्टोक्ती

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार सामान्यांना दिलासा देणार, नवीन वर्षात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ६-१० रुपयांनी कपात होणार, अशी बातमी २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात आली होती. पण, आता सरकारनेच या बातम्यांचे खंडन केले आहे. या नववर्षात पेट्रोल-डिझेलच्या दरात कुठलीही कपात होणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.



केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी या वृत्ताला पूर्णविराम दिला आहे. पुरी यांनी बुधवारी सांगितले की, इंधनाच्या (पेट्रोल-डिझेल) किमती कमी करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही, ही केवळ अफवा आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किमती जवळपास ४०-८० टक्क्यांनी वाढल्या आहेत. पाश्चात्य देशांमध्येही किमती वाढल्या आहेत. पण, आपल्याकडे भाव अजूनही कमी आहेत. दूरदर्शी नेतृत्वामुळेच आपण हे करू शकलो आहोत. नोव्हेंबर २०२१ आणि मे २०२२ मध्ये केंद्रीय उत्पादन शुल्कात कपात करण्यात आली, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

दरम्यान, हरदीप सिंग पुरी यांच्या या वक्तव्यानंतर तेल कंपन्यांच्या शेअर्समध्ये अचानक वाढ झाली. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (क्ष्ज्ञउङ) च्या शेअर्समध्ये ३.२७% ची वाढ नोंदवण्यात आली. तर इझउङ शेअर्स १.०६% आणि खजउङ शेअर्स १.७६% वाढले. दरम्यान, मे २०२२ पासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणताही बदल झालेला नाही. गेल्या वेळी केंद्र सरकारने उत्पादन शुल्क कमी केले होते.

## नितीश कुमार इंडिया आघाडी संजोयक होणार? लालूप्रसाद यादव, उद्धव ठाकरेंना फोन; लवकरच निर्णय

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

काही दिवसांपूर्वी इंडिया आघाडीची एक बैठक दिल्लीत झाली. या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे पंतप्रधानपदाचे उमेदवार असावेत, असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. खरगे पंतप्रधानपदाचे चेहरा असण्याला काहींनी पाठिंबाही दिला. मात्र, त्यावर शिक्कामोर्तब होऊ शकले नाही. या बैठकीत मानापमान नाट्य घडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. यातच आता बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमारइंडिया आघाडीचे संयोजक होऊ शकतात, असा दावा केला जात आहे.

काही मीडिया रिपोर्टनुसार,



विरोधी पक्षांची आघाडी असलेल्या इंडिया अलायन्स संयोजकाबाबत लवकरच अंतिम निर्णय घेऊ शकते. इंडिया आघाडीचे संयोजक म्हणून नितीश कुमार यांच्या नावाला लवकरच मंजुरी मिळू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. काँग्रेसच्या वरिष्ठांनी याबाबत जेडीयू प्रमुख नितीश कुमार आणि आरजेडी प्रमुख लालू प्रसाद यादव यांच्याशी चर्चा केल्याचे समजते. दिल्लीतील बैठकीनंतर नाराजी दूर करण्यासाठी काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी नितीश कुमारांना फोन केला होता, अशीही चर्चा होती. याबाबतचा अधिक तपशील देण्यात आलेला नाही.

**इंडिया आघाडीची होणार व्हर्चुअल मिटिंग**

आगामी काही दिवसांत इंडिया आघाडीत सामील घटक पक्षांच्या नेत्यांची एक व्हर्चुअर मिटिंग होणार असल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत संयोजक म्हणून नितीश कुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निर्णयाबाबत आघाडीतील अन्य पक्षांना विश्वासात घेतले जात आहे. यासंदर्भात नितीश कुमार आणि उद्धव ठाकरे यांच्यात चर्चा झाली, असे कळते. तसेच दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनीही नितीश कुमार यांना संयोजक बनवण्याचे समर्थन केल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, विरोधी पक्षांना एकत्र करून इंडिया आघाडीच्या व्यासपीठावर आणण्यात नितीश कुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यात एकूण २८ पक्ष आहेत. दिल्लीत झालेल्या बैठकीत पंतप्रधानपदाचा उमेदवार आणि हिंदी भाषेच्या मुद्द्यावर नितीश कुमार नाराज असल्याची चर्चा होती.

## यापुढे आता सरकारशी चर्चा बंद मनोज जरांगेंची मोठी घोषणा



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक जालना**

मराठा आरक्षणाबाबत मोठी अपडेट अस्मोर येत असून, मनोज जरांगे यांनी आता सरकारसोबतच्या चर्चेला पूर्णविराम देण्याची घोषणा केली आहे. आंतरवाली सराटीमध्ये आज मनोज जरांगे आणि मुंबई येथील मराठा आंदोलकांमध्ये बैठक होत आहे. याच बैठकीत बोलतांना मनोज जरांगे यांच्याकडून याबाबत घोषणा करण्यात आली आहे. मुंबईकर आणि माझ्यासह यापुढे कोणीही मराठा आंदोलक सरकारशी चर्चा करणार नाही, असे जरांगे यांनी म्हटले आहे. जरांगे यांच्या या निर्णयामुळे आता सरकारच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण चर्चाच बंद झाली तर मराठा आरक्षणावर तोडगा कसा निघणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, २० जानेवारीला मुंबईकडे निघणार असून, तब्बल २ कोटी मराठे मुंबईत येतील. आता मुंबईतल्या आंदोलकांच्या खांद्यावर समाजाची जबाबदारी आहे. तसेच, इथून येणाऱ्या आंदोलकांची जबाबदारी मुंबईच्या आंदोलकांवर असणार आहे. आपल्याला चारही बाजूने घेरले, तर आपण १० बाजूने घेरू यात. मुंबई आंदोलनासाठी दीड लाख स्वयंसेवक तयार करत आहोत. वकिलांची २०० जणांची टीम असून, १५०० डॉक्टरांची टीम लागणार आहे. दीड महिन्याचे अन्न सुरवातीला घेऊन जाणार आहे. मुंबईला जाताना रस्त्याने पिकांचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी घ्यायची आहे. तसेच, मुंबईकर आणि माझ्यासह यापुढे कोणीही मराठा आंदोलक सरकारशी चर्चा करणार नाही, असेही जरांगे म्हणाले आहेत.

## जितेंद्र आव्हाडांचा अजित पवारांवर हल्लाबोल पहिल्यांदाच मनातले सर्वकाही बोलले

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक शिर्डी**

मी सकाळी ६ वाजता उठतो. सकाळी उठल्यावर करणार काय? अधिकाऱ्यांची झोप खराब करायची? ६ वाजता काम सुरू होत नाही. तुम्हाला झोप लागत नाही ही आमची चूक आहे का? कुठल्याही अधिकाऱ्याला अजित पवारांचे ६ वाजताचे बोलावणे आवडायचे नाही. आमचेही अधिकारी मित्र आहेत. तुमचे आऊटपूट काय? प्रत्येक विभागात हस्तक्षेप करणे. अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन मंत्र्यांना अस्वस्थ करणे हे तुम्ही केले नाही का?



तुम्ही सुनील केदार यांना त्रास दिला नाही का? असे अनेक मंत्री होते जे खासगी बोलायचे. उपमुख्यमंत्रिपदच संविधानिक नाही. मग कुठल्या अधिकाराखाली तुम्ही बैठका घेत होता? असा घणाघात जितेंद्र आव्हाडांनीअजित पवारांवर केला आहे.

जितेंद्र आव्हाडांनी शिर्डीतील पक्षाच्या शिबिरात माध्यमांशी बोलताना सर्वकाही पहिल्यांदाच बोलले. आव्हाड म्हणाले की, माझ्याकडे पालकमंत्री पद येऊच दिले नाही. एकनाथ शिंदे-अजित पवार हेच पालकमंत्री ठरवत होते. मला पालकमंत्री पद द्या असं मी अजित पवारांना भेटून सांगितले होते. मला एकनाथ शिंदे स्वत: म्हणाले. जितेंद्र आम्हाला रायगड हवं होते. आम्ही पालघर तुम्हाला द्यायला तयार होतो. मी खास तुझ्यासाठी पालघर सोडले होते. परंतु अजित पवार रायगड सोडण्यास तयार नव्हते. कारण आदिती तटकरेंना रायगडचे पालकमंत्री बनवायचे होते. माझा प्रश्न अजित पवारांना तेव्हाच होता. मी पक्षात ज्येष्ठ नाही का? मला कोरोना झाल्यानंतर २ तासांत तुम्ही पालकमंत्री पदावरून काढलं, त्यानंतर कोरोना झालेल्या किती जणांना काढले? या पक्षात सावत्र होतो का? असा सवाल त्यांनी विचारला.

## मोहम्मद सिराजच्या ६ विकेट्स, दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ ५५ धावांत तंबूत

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक जोहानासबर्ग**

मोहम्मद सिराजने दुसऱ्या कसोटीचे पहिले सत्र गाजवले. त्याने पहिल्या स्पेलमध्ये ९-३-१५-६ अशी भन्नाट गोलंदाजी करून दक्षिण आफ्रिकेला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. त्याला जसप्रीत बुमराह व मुकेश कुमार यांची मिळालेली साथ अप्रतिम होती. भारताविरुद्धची कोणत्याही संघाची कसोटीतील ही सर्वात निचांक कामगिरी ठरली.

सिराजने चौथ्या षटकात एडन मार्करमला ( २) झेलबाद करून माघारी पाठवले. कर्णधार डीन एल्गर ( ४) याचाही सिराजने त्रिफळा उडवला. आफ्रिकेला बसलेला हा खूप मोठा धक्का होता. टॉनी डे जॉर्जी ( २) व पदार्पणवीर त्रिस्तान स्टब्स ( ३) हेही फार काही करू शकले नाही. जसप्रीत बुमराहने ९व्या षटकात स्टब्सला बाद केले, तर सिराजने जॉर्जीचा अडथळा दूर केला. सिराज एक्स्प्रेस इथेच थांबली नाही आणि त्याने डेव्हिड बेडिंगहॅम ( १२) व मार्को यानसेन ( ०) यांचा अडथळा दूर करताना आफ्रिकेची अवस्था ६ बाद ३४ अशी केली. त्यात कायले वेरेयने ( १५) याच्या विकेटची भर पडली. सिराजने त्याच्या ८.५ षटकांत १५ धावा देताना ६ विकेट्स घेतल्या. ही त्याची सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी ठरली.

मुकेश कुमारने त्याच्या पहिल्या षटकात आफ्रिकेला धक्का देताना केशव महाराजला ( ३) बाद केले. जसप्रीतनेही सामन्यातील दुसरी विकेट घेतली आणि नांद्रे बर्गरचा ( ४) बळी घेताना आफ्रिकेला नववा धक्का दिला. मुकेशने सान्यातील दुसरी विकेट घेऊन आफ्रिकेला ५५ धावांवर ऑल आऊट केले.

## जामिनासाठी नवाब मलिकांनी सर्वोच्च न्यायालयात जावं : मुंबई उच्च न्यायालय



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नवाब मलिक यांचे अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमसोबत संबंध असल्याचा आरोप विरोधकांनी अनेक वेळा केलाय. तसंच कुर्ल्यातील जमीन घोटाळ्याप्रकरणी नवाब मलिक यांना ईडीनं अटक केली होती. मात्र, त्यांना वैद्यकीय कारणास्तव सुप्रीम कोर्टानं ३ महिन्यांपूर्वी अल्पकालीन जामीन मंजूर केला होता. पण, त्याआधीच त्यांनी गेल्या वर्षी नियमित जामिन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर आज सुनावणी झाली. यावेळी मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलंय की, नवाब मलिक यांना सुप्रीम कोर्टात अंतरिम दिलासा मिळाला आहे. त्यामुळं मलिक यांनी नियमित जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात जावं.

अंमलबजावणी संचालनालयानं नवाब मलिक यांच्यावर बेकायदेशीर आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला आहे. आरोपांच्या चौकशीसाठी मलिक काही काळ तुरुंगात देखील होते. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल केली होती. त्यानंतर मलिक यांना वैद्यकीय कारणास्तव सर्वोच्च न्यायालयानं अंतरिम जामीन मंजूर केला होता. तेव्हापासून मलिक जामिनावर बाहेर आहेत. मात्र, यापूर्वी नॉन-मेडिकल जामीन घेताना त्याचा मूळ अर्ज मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित होता. त्यावर आज सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी मूळ जामिनासाठी नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले आहेत.

नवाब मलिक यांच्यावर अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या कुटुंबाकडून जमीन खरेदी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात तपास यंत्रणेनं मलिक यांच्यावर मनी लॉंड्रिंगचा आरोप केला आहे.

## नागपुरात आणखी पाच उड्डाणपूल होणार, ७९२ कोटींच्या निधीला मंजुरी; पूर्व, मध्य व दक्षिण नागपूरला जोडणार

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

उपराजधानीत आणखी पाच उड्डाणपूल तयार होण्याचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे. राज्य शासनाने शहरातील पाच उड्डाणपुलांसाठी ७९२ कोटींच्या निधीला मंजुरी दिली असून या उड्डाणपुलांच्या माध्यमातून पूर्व, मध्य व दक्षिण नागपूरला जोडण्यात येणार आहे. यामुळे या भागांमधील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत मिळणार आहे.

पूर्व नागपूरचे आ.कृष्णा खोपडे यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. या पाच उड्डाणपुलांबाबत अनेक काळापासून मागणी होती. याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरदेखील मागणी करण्यात आली आहे. महारेलतर्फे उड्डाणपुलाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. त्यानंतर हा प्रस्ताव दोन्ही



नेत्यांसमोर मांडण्यात आला. १२ जून रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीदरम्यान या उड्डाणपुलांना मान्यता देण्यात आली होती. राज्य शासनाकडूनदेखील या प्रकल्पासाठी ७९२ कोटींच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे. या उड्डाणपुलाच्या निविदा प्रक्रियेला लवकरच सुरुवात होणार असून महारेल कंपनीचे एमडी राजेशकुमार जैस्वाल यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली आहे.

**या मार्गांवर होणार उड्डाणपूल**

रेशीमबाग ते के.डी.के. कॉलेज, टेलिफोन एक्सचेंज चौक ते भांडेप्लॉट - २५१ कोटी- चंद्रशेखर आझाद चौक- गंगाजमुना ते मारवाडी चौक - ६६ कोटी

लकडगंज पो.स्टे. ते वर्धमाननगर - १३५ कोटी

नंदनवन, राजेंद्रनगर चौक ते हसनबाग चौक - ६६ कोटी

वर्धमाननगर ते निर्मलनगरी उमरेड रोड - २७४ कोटी

## मुख्यमंत्रीपद न मिळाल्याची खंत शिवराजसिंह चौहान यांच्या मनातलं ओठावर

**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक**

देशातील ५ राज्यात नुकतेच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठं यश मिळालं. ५ पैकी तीन राज्यात भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली. मात्र, या तिन्ही राज्यात भाजपाने मुख्यमंत्रीपदी नव्या चेहऱ्यांना संधी देत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. विशेषत: मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना खुर्चीवरुन पायउतार व्हावं लागलं. मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी मोहन यादव यांना संधी मिळाली. शिवराज सिंह म्हणजेच मध्य प्रदेशमधील मामांना हटवण्यात आल्यामुळे अनेकांना दु:ख झालं. आता, शिवराजसिंह चौहान यांच्याही मनातील खदखद बाहेर पडली आहे.

मुख्यमंत्रीपद गमावल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना शिवराजसिंह चौहान यांनी, मी भाजपाचा कार्यकर्ता आहे, पक्ष जो आदेश देईल तो मला मान्य आहे. मी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नव्हतो, असेच त्यांनी म्हटलं होतं. मात्र, आज एका कार्यक्रमात बोलताना त्यांच्या मनातील खंत ओठावर आल्याचं दिसून आलं.

## संपादकीय ......

# जागावाटपाचा पेच आणि नेत्यांचे डाव!

*आगामी लोकसभा निवडणुकीची चाहूल लागल्याने महाराष्ट्रातील महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपावरून खलबतांनी जोर धरलेला आहे. आपल्या पक्षालाच जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न होताना दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीत जागावाटपावरून सत्ताधारी आणि विरोधी आघाडीतील घटक पक्षात सहजासहजी एकमत होईल, असे दिसत नाही. जागांचा आकडा आतापासूनच मोठा केला, तरच समाधानकारक जागा पदरात पाडून घ्यायचा त्यामागचा हेतू असणे स्वाभाविकच आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपावरून मतमतांतरे असली तरी याचा निकाल दिल्लीतून लागणार आहे.*

*महाविकास आघाडीत जागावाटपावरून वादाची ठिणगी पडल्याचे म्हटले जात असले तरी महायुतीत सर्व काही आलबेल आहे, असे नाही. शिवसेनेतून बाहेर पडून भाजपसोबत सत्ता स्थापन करण्यात महत्वाची भूमिका बजावलेल्या शिंदे गटाला भाजपला दुखावून चालणार नाही. एकतर दीड वर्षे झाली असतानाही शिंदे गटातील अनेक इच्छुकांची मंत्री होण्याची इच्छा अद्याप पूर्ण झालेली नाही. उलट, उशिराने सोबत आलेल्या राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला भाजपकडून झुकते माप दिले गेले. राष्ट्रवादीच्या गटाला वजनदार खाती दिली गेली आहेत. त्यांच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या गेल्या आहेत. त्यामुळे शिंदे गटात छुपी नाराजी नक्कीच आहे. सोबत असलेल्या खासदारांना पुन्हा उमेदवारी द्या, असा आग्रह शिंदे गटाकडून धरला जात आहे.*

*दुसरीकडे, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटालाही समाधानकारक जागा द्याव्या लागणार आहेत. त्या गटाकडूनही भाजपवर तसा दबाव असणार आहे. सध्या महायुतीत याची उघडपणे चर्चा होत नसली तरी भाजपला याचा सामना करावाच लागणार आहे. शिंदे आणि अजित पवार गटाला जागावाटप करताना सोबत असलेले अपक्ष आणि स्वपक्षीय दुखावले जाणार नाहीत, याचीही खबरदारी भाजपला घ्यावी लागणार आहे. शिंदे गटासोबत १३ खासदार आहेत, तर अजित पवार यांच्यासोबत फक्त एकच खासदार आहे. त्यामुळे शिंदे गट आपल्यासोबत असलेल्या सर्व खासदारांना पुन्हा उमेदवारी मिळावी, यासाठी प्रयत्नशील असणार आहे. महाराष्ट्रात २५ ते ३० जागा लढवण्याचा भाजपचा प्रयत्न असणार आहे. त्यामुळे जागावाटप करताना शिंदे गट आणि भाजपमध्येच चढाओढ असणार आहे.*

*जागावाटपाचा तिढा सोडवणे भाजपच्या महाराष्ट्रातील नेत्यांना अवघड जाईल, असे दिसते. महाराष्ट्रात सत्ता मिळवण्यासाठी भाजपला अनेक तडजोडी कराव्या लागल्या. देवेंद्र फडणवीस यांना मनावर दगड ठेवून उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले आहे. महाराष्ट्रातील सत्ता मिळवण्यासाठी फडणवीसांसोबत भाजपमधील अनेक निष्ठावंतांनाही सत्ता आणि मंत्रीपदापासून डावलण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीत मित्रपक्षांना जागावाटपात झुकते माप दिले गेले, तर भाजपमधील निष्ठावानांचा मोठा गट पुन्हा नाराज होण्याचीही शक्यता लक्षात घ्यावी लागणार आहे. जागावाटपाचा संभाव्य तिढा सोडवण्याचे आव्हान मोदी-शहा यांच्यापुढेच नक्कीच असणार आहे. सध्यातरी राज्यात महायुतीत ज्याने जी जागा जिंकली ती त्याला मिळावी, असा आग्रह एका गटाकडून धरण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात राज्यातील सत्ता समीकरणावर चर्चाही झाली आहे.*

# वरुड चे संत्रा उत्पादक शेतकरी झाले आक्रमक

## संत्रा तहसील कार्यालयाच्या आवारात आणून फेकला



**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक वरूड,** – तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकर्यांचा संत्रा व्यापारी खरेदी करीत नसल्याने जानेवारी महिन्यातही संत्रा झाडावरच असल्याचे दिसत आहे. येथील संत्रा व्यापारी राजस्थानचा संत्रा खरेदी करीत आहे, परंतु या भागातील संत्रा कमी दरात खरेदी करून व्यापार्यांनी एकत्र येऊन भाव पाडले आहे, असा आरोप करीत मंगळवारी संत्रा उत्पादक शेतकर्यांनी आपला संत्रा तहसील कार्यालयाच्या आवारात आणून फेकला. राजस्थान येथे पिकणारा संत्रा व्यापार्यांकडून खरेदी करून नागपुरी लेबल लावून विक्री केल्या जात आहे. त्यामुळे या भागातील संत्रा उत्पादक शेतकर्यांच्या शेतातील ४० ते ५० टक्के संत्रा जानेवारी महिन्यातही झाडावरच पिवळा पडत आहे. पिवळा पडलेला संत्रा तोडावा तरी कसा, त्यांचे व्यवस्थापन कसे करावे, पुढील पीक कसे घ्यावे असे अनेक प्रश्न शेतकर्यांसमोर उभे ठाकले आहे. या विषयी कुठल्याही लोकप्रतिनिधींना काही देणेघेणे उरलेले नाही असे दिसत असल्याने शेतकरी आता स्वत: या बाबत राज्यकर्त्यांकडे पाठपुरावा करणार आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारने याकडे जर आधीच लक्ष दिले असते तर ही वेळ संत्रा उत्पादक शेतकर्यांवर आली नसती.

तालुक्यातील शेतकर्यांचा उदरनिर्वाह हा पूर्णतः संत्रा फळ बागांवर अवलंबून असल्याने आज निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे संत्रा उत्पादक शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी झाला आहे. तो संत्रा फळांची विक्री झाली नसल्याने चिंतातुर झाल्याचेही दिसून येत आहे. अशा परिस्थितीत जगावे की मरावे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.संत्रा उत्पादक शेतकर्यांच्या आत्महत्या सरकारला जर का थांबवायच्या असतील तर राज्य सरकारने ईतर शेतीमालाप्रमाणे संत्रा उत्पादक शेतकर्यांपासून संत्रा सुद्धा खरेदी करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्या शेतकर्यांनी तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. या वेळी आंदोलक शेतकर्यांनी आपली संत्री नायब तहसीलदार पंकज चव्हाण यांना भेट देत उर्वरित संत्रा तहसील कार्यालयातच फेकून सरकारचा निषेध केला.

## प्रा. दिनेश सूर्यवंशी पश्चिम विदर्भ समन्वयक




**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रा. दिनेश सूर्यवंशी यांची महाविजय – २०२४ अभियानांतर्गत पश्चिम विदर्भातली पक्षाचे सुपर वॉरियर्सचे समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. आगामी लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीच्या शानदार विजयासाठी प्रा. दिनेश सूर्यवंशी यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. हिंगोली, यवतमाळ, वाशीम, चंद्रपूर, बुलढाणा, अकोला, अमरावती व वर्धा या ७ लोकसभा, ३० विधानसभा, ९४८० बूथ, १०४२८० बूथसमिती प्रमुख, ३२४० सुपर वॉरियर्स यांच्या माध्यमातून प्रत्येक बुथवर भारतीय जनता पार्टीच्या मतांची टक्केवारी ही ५१ टक्क्यापेक्षा जास्त असावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवण्यात आला आहे.

नियुक्तीची घोषणा ३० डिसेंबर रोजी मुंबईत झालेल्या महाराष्ट्र प्रदेश पदाधिकारी व कार्य समिती बैठकीत करण्यात आली. दिलेल्या जबाबदारी बद्दल प्रा. सूर्यवंशी यांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रदेश सरचिटणीस रणधीर सावरकर, प्रदेश उपाध्यक्ष चैनसुख संचेती, विदर्भ प्रदेश संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर यांचे आभार मानले आहे.

# नववर्षाच्या पहिल्याच दिवसा पासुन शिक्षकांची दांडीला सुरुवात

## मेळघाटातील रेट्याखेडा येथील शाळा बंद



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा** – महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार यांच्या माध्यमातून शिक्षणावर मेळघाटात मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. दुर्गम भागातील मुले सुशिक्षित व्हावीत, शिक्षणाच्या माध्यमातून मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा व दुर्गम खेड्यापाड्यातील आदिवासी मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावीत, या उद्देशाने शासन प्रयत्नशील आहे; परंतु कामचुकार शिक्षक व शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे मेळघाटातील मुले अज्ञानाच्या खाईत लोटली जात आहेत. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दुर्गम भागातील अनेक शाळा बंद असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी दोन शिक्षक आहेत, त्यातील एक शिक्षक नेहमी गायब असतो. सुट्टीचे कारण देतात किंवा ऑनलाईनचे कारण देऊन शिक्षक शाळेला दांडी मारतात. सोमवारी १ जानेवारी रोजी दुर्गम भागातील रेट्याखेडा या ठिकाणी भेट दिली असता येथील जिल्हा परिषदेची शाळा बंद दिसून आली. या ठिकाणचे शिक्षक मागील चार दिवसापासून शाळेवर आलेच नाहीत, अशी धक्कादायक माहिती गावकर्यांकडून समजली. गावकर्यांची संवाद साधला असता मागील चार दिवसापासून या ठिकाणी शिक्षक आलेच नाहीत आणि हे शिक्षक नेहमीच असे शाळेला दांडी मारतात, अशी माहिती गावकरी रामचंद्र मोतीराम चतुर, कमलेश आठवा तसेच गजानन धिकार यांनी दिली. ढशरलहर्शी ीीळज्ञश यासह शाळेमध्ये मुलांना पिण्याच्या पाण्याची सोय सुद्धा नव्हती. तसेच मुलांकरिता शौचालय व बाथरूम सुद्धा या ठिकाणी अतिशय खराब अवस्थेत दिसून आले. एकंदरीत मेळघाटात शिक्षणाची व्यवस्था खालावली असून वरिष्ठ अधिकार्यांचे सुद्धा या भागात दौरे होत नाही. त्यामुळे या शिक्षकांवर कुणाचाच वचक राहिलेला नाही.

### दोषी आढळल्यास कारवाई

रेट्याखेडा ही शाळा अतिशय दुर्गम असून या ठिकाणी नऊ विद्यार्थी आहेत व दोन शिक्षक आहेत. एक ते चार वर्ग आहेत. या ठिकाणी शिक्षक उपस्थित राहात नसतील तर हा प्रकार अतिशय चुकीचा आहे. प्रत्यक्षात चौकशी करून या प्रकारात दोषी आढळल्यास नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया चिखलदरा पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांनी दिली.

परिणामी या भागातील शिक्षणाच्या दर्जा ढासळला असून या भागातील चौथी, पाचवीतील मुलांना साधे मराठी लिहिता, वाचता सुद्धा येत नाही. संबंधित अधिकार्यांवर व शिक्षकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांकडून होत आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात एक्स-रे फिल्मचा तुटवडा

## रुग्ण तसेच नातेवाइकांमध्ये रोष



**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथे एक्स-रे मशीनसाठी लागणाऱ्या फिल्म संपल्याने मागील चार ते पाच दिवसांपासून रुग्णांना एक्स-रे अहवाल घेण्यासाठी दुसऱ्या दिवशी बोलविण्यात येत आहे. त्यामुळे एक्सरे अहवाल पाहिल्याशिवाय पुढील उपचार तरी कसे होतील, असा प्रश्न संतप्त रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाइकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. तर रुग्णालयातील वाढलेल्या रुग्णांच्या संख्येमुळे एक्स-रे फिल्मचा तुटवडा असून फिल्म उपलब्ध होताच रुग्णांना अहवाल देण्यात येत असल्याची माहिती रुग्णालयातून मिळाली आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय येथे सर्वच प्रकारची उपचार सुविधा नि:शुल्क झालयापासून उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे. त्यामुळे अनेक रुग्ण गरज नसतानाही एक्स-रे काढत असल्याचे दिसून येत आहे. इर्विनमधील एक्सरे विभागात रोज सरासरी १५० ते २००च्या जवळपास रुग्ण हे एक्स-रे काढण्यासाठी येतात. अपघातग्रस्त रुग्णांचे निदान करण्यासाठी तातडीने एक्स-रे काढणे हे गरजेचे असते. तसेच आठवड्यातील दर बुधवारी दिव्यांग बांधवांची तपासणी होते. त्यामुळे या दिवशी एक्स-रेसाठी येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण हे जास्त मोठ्या प्रमाणावर असते. आणि एक्स-रेच्या अहवालानंतरच संबंधित रुग्णांवर आवश्यक ते उपचार केले जातात. परंतु रुग्णालयातील ज्या फिल्मवर अहवाल छापला जातो त्या फिल्मचा साठाच संपल्याने रुग्णांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागत आहे.

त्यामुळे एक्स-रे विभागातून रुग्णांना आज एक्स-रे करा अहवालासाठी दोन दिवसांनी या असे सांगण्यात येत आहे. मागील चार दिवसांपासून फिल्म नसल्याने शेकडो रुग्णांचे अहवाल अप्राप्त आहेत. रुग्णालय प्रशासनाने काही प्रमाणात फिल्म खरेदी केल्या असून ज्या रुग्णांचे अहवाल पेंडिंग आहेत त्यांना आधी त्यांचा अहवाल देण्यात येत असून नवीन रुग्णांना दुसऱ्या दिवशी बोलविण्यात येत आहे.




## थोडं काम केलं तरी दिवसभर थकवा येतो? नियमित ७ पदार्थ खा-रक्त भरपूर वाढेल

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक** – जागतिक आरोग्य संघटनेच्या रिपोर्टनुसार हिमोग्लोबिन कमी होणं ही एक गंभीर समस्या आहे. हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे लोकांच्या शरीरात रक्त कमी होण्याची समस्या उद्भवते. शरीरात रक्त व्यवस्थित तयार झाले नाही तर थकवा येणं, कमकुवतपणा ही लक्षणं जाणवतात. खाण्यापिण्यात चांगल्या पदार्थांचा समावेश केला तर रक्त तयार होण्यात अडथळे येत नाहीत.



हेल्थलाईनच्या रिपोर्टनुसार शरीरात रक्त तयार होणं ही महत्त्वाची प्रोसेस असते. एक प्रोटिन ज्याला ट्रांसफेरिन असं म्हटलं जातं. यामुळे शरीराला रक्त मिळते आणि रेड ब्लड सेल्स तयार होण्यास मदत होते. हिमोग्लोबिन लेव्हल बुस्ट होण्यास मदत होते. म्हणूनच आपल्या आहारात या पदार्थांचा समावेश करा. (त्रेन्न त्रेी क्शोसश्रे-लळप)

**१) हिरव्या भाज्या**

थंडीत हिरव्या भाज्या बाजारात सहज मिळतात. पालक, ब्रोकोली आयर्नचा एक चांगला स्त्रोत आहेत. यामुळे हिमोग्लोबिन लेव्हल वाढण्यास मदत होते. ब्लड सेल्सची संख्या वाढवण्यासाठी तुम्ही बीटाचाही आहारात समावेश करू शकता.

**२) ब्राऊन राईस**

ब्राऊन राईस एक हेल्दी सुपरफूड आहे ज्याचा वापर करून अनेक समस्या दूर करता येता. यात आयर्नचे प्रमाणही चांगले असते. यातील ब्लड हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढवते.

**३) भोपळ्याच्या बीया**

भोपळ्याच्या बीयांमध्ये मिनरल्स फॉस्फरेस, मॅग्नेशियम, मँगनीज आणि कॉपरबरोबरच जिंक आणि आयर्नही असते. यामुळे हिमोग्लोबिन लेव्हल सुधारण्यास मदत होते.

**४) ड्राय फ्रुट्स आणि नट्स**

ड्राय फ्रुट्स आणि नट्स फक्त न्युट्रिशियस नसतात तर वजन कमी करण्यासाठीही फायदेशीर ठरतात. यात मनुके आणि बदाम असतात जे आयर्नचा चांगला स्त्रोत आहेत.

**५) धान्य**– ओट्स, बाजरी इत्यादी पदार्थ हिमोग्लाबीन वाढवण्यास मदत करतात कारण यात आयर्नचे प्रमाण जास्त असते. फळंही मेटाबॉलिझ्म वाढवण्यास मदत करतात.

**६) खजूर**– खजूरात अनेक प्रकारचे पोषक तत्व असतात. शरीरात आयर्नची कमतरता असले तर रेड ब्लड सेल्स काऊंट वाढवण्यासाठी तुम्ही खजूराचे सेवन करू शकता. खजूर खाल्ल्याने इम्यूनिटी वाढण्यास मदत होते.

**७) डाळिंब**– डाळिंबात आयर्न, कॅल्शियम, फायबर्स यांसारखी पोषक तत्व असतात. ज्यामुळे शरीरात रक्ताची कमतरता दूर होण्यास मदत होते. ही फळं खाल्ल्याने हिमोग्लोबिन लेव्हल मेंटेन राहण्यास मदत होते.

# आजपासून चंद्रपुरात 'चांदा ग्रो-२०२४' महोत्सव

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक चंद्रपूर,** राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात ३ ते ७ जानेवारी दरम्यान चांदा क्लब मैदानावर 'चांदा ग्रो-२०२४' चे आयोजन करण्यात येत आहे.कृषी तंत्रज्ञान व्यवस्थान यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा कृषी महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी पत्रकार परिषदेत दिली. लहरपवर-सीु-२०२४ यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटेवार उपस्थित होते.

या कृषी महोत्सवात शेतीविषयक तंत्रज्ञानासोबतच पशु प्रदर्शनी, चर्चा व परिसंवाद, खिचडी महोत्सव, धान्य महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रमासह नोंदणी केलेल्या शेतकर्यांसाठी शेवटच्या दिवशी आकर्षक बक्षिसांची मेजवानी राहणार आहे. कृषी विषयक प्रदर्शन व शासकीय योजना शेतकर्यांपर्यंत पोहचविणे, शेतकरी, शास्त्रज्ञ आणि संशोधन विस्तार विपणन साखळी सक्षम करणे, कृषी विषयक शेतकरी संवाद आयोजित करून शेतकर्यांच्या समस्यांचे निराकरण करणे, विक्रेता ते खरीददार संमेलनाचे आयोजन करून बाजाराभिमुख कृषी उत्पादनास चालना देणे या उद्देशाने जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. लहरपवर-सीु-२०२४ या महोत्सवात पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार असून, शेतकर्यांना आकर्षक बक्षिसे दिली असून, मुनगंटीवार यांच्या हस्ते शेतकर्यांचा सन्मान केला जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.



आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य महोत्सवाच्या निमित्ताने येथील जिल्हा कृषी महोत्सवात ६७५० किलोग्रॅमची खिचडी तयार करण्यात येणार आहे. यापूर्वी एप्रिल २०२२ मध्ये नाशिक येथे बगरीपासून ६००० किलोग्रॅमची खिचडी बनवून इंडिया बुक व आशिया बुकमध्ये नोंद करण्यात आली होती. लहरपवर-सीु-२०२४ चंद्रपूर नगरीत जिल्हा कृषी महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र मिलेट महोत्सव अंतर्गत बाजरीचा वापर करून ६७५० किलोग्रॅमची खिचडी तयार करण्यात येणार आहे.

## ४३ इंचाची पुंगनूर गाय राहणार आकर्षण

आंध्र प्रदेशातील चित्तुर प्रांतात आढळणारी पुंगनुर गाय हे या प्रदर्शनाचे आकर्षण ठरणार आहे. ही गाय केवळ २ फुट उंचीची असून, रंग पांढरा व भुरकट असतो. वर्षभरामध्ये ही गाय १००० लिटरहून अधिक तेही फॅटची मात्रा असलेले दूध देते, अशी मान्यता आहे. जिल्हा कृषी महोत्सवात ४३ इंचाची पुंगनुर गाय विशेष आकर्षण असणार आहे.

# ट्रकचालकांचा संप अखेर मागे

## ‘हिट ॲण्ड रन’ कलमाला ब्रेक

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**– कायद्यातील तरतुदी अद्याप लागू झालेल्या नाहीत. त्या लागू करण्यापूर्वी वाहतूकदारांच्या संघटनांशी चर्चा करू, असे आश्वासन केंद्र सरकारने दिल्याने गेले दोन दिवस सुरू असलेला संप मालवाहतूकदारांनी मंगळवारी रात्री मागे घेतला. याबाबत वाहनचालकांना कळविण्यात आले असून, त्यांनी लवकरात लवकर वाहने चालविण्यास सुरुवात करावी, असे आवाहन संघटनेने केले आहे. तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरवठाही सुरळीत व्हावा, यासाठी टँकरची वाहतूकही तातडीने सुरू करण्यात येईल, असे मोटार ट्रान्सपोर्ट काँग्रेसच्या प्रतिनिधींनी सांगितले.



केंद्र सरकारने हिट ॲण्ड रन केसप्रकरणी दहा वर्षांची शिक्षा आणि सात लाखांच्या दंडाची तरतूद कायद्यात केली आहे. त्याच्याविरोधात सोमवारपासून मालवाहतूकदारांनी देशव्यापी संप सुरू केला होता. केंद्र सरकारतर्फे गृह सचिव अजय भल्ला यांनी मोटार ट्रान्सपोर्ट काँग्रेसच्या प्रतिनिधींना आश्वासन दिल्यानंतर, त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा संप मागे घेण्यात आला.संप मागे घेतला असला तरी वाहनांमध्ये पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी वाहनचालक पेट्रोल पंपावर धाव घेत होते. वरळी नाका, चेंबूर, सायन, बोरीवली, अंधेरी, माहीम परिसरात वाहतूककोंडी झाली होती.

> ■ केंद्र सरकारने आमची मागणी मान्य केली आहे. कायद्यातील तरतुदी लागू करण्यापूर्वी चर्चा केली जाणार आहे. आम्ही सदैव वाहनचालकांसोबत आहोत. चालकांनी आता चिंता करू नये. कामावर परतावे. **– बाल मालकीत सिंग,** अध्यक्ष, कोअर कमिटी ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट काँग्रेस

# कारसेवेत असल्याचा अभिमान

## कलंकित ढाचा पडला तेव्हा तिथेच होतो: देवेंद्र फडणवीस

### श्रीराम मंदिर प्रतिकृती रथाचा मुंबई येथे शुभारंभ

**नागपुर, दि.३विदर्भ प्रजासत्ताक –** राम मंदिरात रामलल्ला प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याला आता काही दिवस राहिले आहेत. अयोध्येत कामांना आणखी वेग आला आहे. देशभरात हा सोहळा साजरा केला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सुमारे ७ ते ८ हजार मान्यवर या भव्य सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. राम मंदिरावरून आरोप-प्रत्यारोपांची धारही वाढताना दिसत आहे. कारसेवकांनी कलंकित ढाचा पाडला तेव्हा मी तिथे उपस्थित होतो. तिन्ही वेळा कारसेवेत गेलो होतो, याचा अभिमान आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

श्रीराम मंदिर प्रतिकृती रथाचा मुंबई येथे शुभारंभ झाला. यावेळी दिग्दर्शक रोहित शेट्टी, मंत्री गिरीश महाजन, श्वेता शालिनी व अन्य मान्यवर उपस्थित होते. यानंतर मीडियाशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राम मंदिर देशात तयार होत आहे. हे पर्व सगळ्या देशाचे आहे. प्रत्येक हिंदू माणसाचे आहे. देशात भारतीय संस्कृती मानणाऱ्या प्रत्येकाचे मंदिर आहे. ज्याला वाटते आहे मी हिंदू आहे, ज्याला वाटते मी भारतीय आहे अशा प्रत्येक व्यक्तीसाठी हे पर्व आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

**बाकीचे तेव्हा कुठे लपले होते त्यांच्यावर कशाला बोलायचे?**

कारसेवकांनी बाबरीचा कलंकित ढाचा पाडला तेव्हा तिथे उपस्थित होतो. या गोष्टीचा अभिमान आहे की, तिन्ही वेळा कारसेवेत गेलो होतो. बाकीचे तेव्हा कुठे लपले होते त्यांच्यावर




कशाला बोलायचे? मी काही लोकांची पर्वाच करत नाही. जेव्हा कारसेवा करायची होती तेव्हा हे लोक लपून बसले होते. हे कुणीही कारसेवेसाठी गेले नाहीत. आम्ही कारसेवक आहोत आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे. तिन्ही कारसेवांमध्ये मी गेलो होतो. बदायूच्या तुरुंगात गेलो आहे. आता काही लोक जळतात कारण ते घाबरून घरी बसले होते. त्यांच्याविषयी कशाला बोलायचे, या शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

दरम्यान, देशात ५०० वर्षांच्या संघर्षानंतर प्रभू श्रीरामाचे मंदिर तयार होत आहे. आपल्यावर जो कलंक बाबरने लावला होता तो हटवण्याचे काम आम्ही करत आहोत. या देशाची आस्था असलेल्या रामाची मूर्ती मंदिरात असणार आहे. अशावेळी राजकारण करणे हे अत्यंत हीन दर्जाचे आहे. ही अशी वेळ आहे जेव्हा सगळे मतभेद विसरुन रामापुढे हात जोडले पाहिजेत आणि संपूर्ण देश राममय कसा होईल ते पाहिले पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# काळजी घ्या, हुडहुडी वाढणार मध्य भारतात थंडीची लाट

**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** – देशातील काही भागात थंडीची तीव्र लाट असून किमान तापमान आठ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. दरम्यान, येत्या काही दिवसात रात्रीच्या तापमानात आणखी घट होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने व्यक्त केली आहे. उत्तर भारतात थंडी आणि दक्षिण भारतावर पावसाचे सावट असताना हवामान खात्याने देशाच्या मध्यवर्ती भागात थंडीची लाट येईल, असा अंदाज व्यक्त केला आहे.



आजपासून पुढील तीन दिवस उत्तर-पश्चिम आणि पूर्व भारताच्या काही भागात दाट धुके राहण्याचा देखील अंदाज वर्तवला आहे. उत्तर भारतात आधीपासूनच थंडी असताना आता पुन्हा त्याठिकाणी थंडीच्या तीव्र लाटेचा इशारा देण्यात आला आहे. अनेक राज्यांमध्ये पाऱ्यात वेगाने घसरण होऊन कडाक्याची थंडी पडत आहे. पंजाब आणि हरियाणातील किमान तापमान सर्वाधिक वेगाने कमी होत असून मंगळवारी पंजाब या राज्यात सर्वाधिक कमी म्हणजे सहा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. आता मध्य भारतात जानेवारीत थंडी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

# संप मिटेना, अंगणवाड्यांच्या चाव्या ताब्यात घेण्याचे आदेश

### प्रशासनाला आयुक्त रुबल अग्रवाल यांचे आदेश

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्याने लाभार्थी आहारापासून वंचित राहू नयेत यासाठी आहार पुरवठ्याची, अंगणवाडी केंद्र संचालनाची पर्यायी व्यवस्था करण्याच्या सूचना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त रूबल अग्रवाल यांनी जिल्हा परिषदेच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दरम्यान, ग्रामपंचायतीच्या साहाय्याने अंगणवाड्यांचा पंचनामा करुन पर्यवेक्षिकांनी तत्काळ चाव्या ताब्यात घ्याव्यात, असे आदेश दिले आहेत.




अंगणवाडी ही शासकीय मालमत्ता असून संबंधित ग्रामपंचायतीच्या साहाय्याने अंगणवाडी सेविकांच्याकडून पंचनामा करून अंगणवाडी पर्यवेक्षिकांनी तत्काळ चाव्या ताब्यात घ्याव्यात. नागरी भागात बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी स्थानिक नगरसेवक, स्वयंसेवक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या समक्ष पंचनामे करावेत. चावी देण्यास टाळाटाळ झाल्यास कायदेशीर कारवाई करावी. अंगणवाडी केंद्रातील आहार शिजवणे व आहाराचे वाटप ग्रामपंचायतीमधील शिपाई, डाटा एन्ट्री ऑपरेटर करणार आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेची परिणामकारकपणे अंमलबजावणी व्हावी. तसेच शासनाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार लाभार्थ्यांना किमान ३०० दिवस आहार पुरवठा करण्यासाठी आहार वाटपाची पर्यायी व्यवस्था व्हावी यासाठी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. यामध्ये हलगर्जीपणा केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही आदेशात म्हटले आहे.

> ■ अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या संपामुळे आयुक्ताकडून चाब्या घेण्याचे निर्देश आले आहेत. मात्र जिल्ह्यात सध्या बचत गट, शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्या माध्यमातून मुलांना पोषण आहार दिला जात आहे. त्यामुळे सध्या तरी एकाही अंगणवाडी केंद्राच्या चाब्या ताब्यात घेतलेल्या नाहीत. **– डॉ. कैलास घोडके,** डेप्युटी सीईओ, महिला व बालकल्याण

# रोजगाराच्या शोधात निघालेल्या बिहारी युवकावर काळाची झडप

## तेलंगणा एक्स्प्रेसमधून पडून मृत्यू : गाडी थांबवली, मात्र वेळ निघून गेली

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर –** कामाच्या शोधात आपले गाव, आपला प्रांत सोडून तो परप्रांतात गेला. तेथे भ्रमनिरास झाल्याने तो राजधानी दिल्लीत रोजगार शोधण्यासाठी निघाला. मात्र, धावत्या गाडीतून तो खाली पडला आणि काळाने डाव साधला. त्याचा मृतदेहच त्याच्या गावाला परत नेण्याची वेळ त्याच्या आप्तस्वकीयांवर आली आहे. मन विषन्न करणारी ही घटना मंगळवारी दुपारी ४ वाजता बुटीबोरी-गुमगावजवळ घडली.



जितेंद्रकुमार सिकंदास (वय १९) असे मृताचे नाव आहे. सूत्रांनुसार, बिहारमध्ये राहणाऱ्या जितेंद्रच्या कुटुंबात आई बहीण आणि एक भाऊ आहे. घरची स्थिती हलाखीची आणि गावात रोजगार नसल्याने जितेंद्र त्याचा चुलतभाऊ विक्रमसोबत काम शोधण्यासाठी दि. २७ डिसेंबरला सिकंदराबादला गेला होता. तेथे मनासारखा रोजगार न मिळाल्याने या दोघांनी दिल्लीला जाऊन काम करण्याचा विचार केला. त्यानंतर ते तेलंगणा एक्स्प्रेसने दिल्लीसाठी निघाले. दुपारी ४च्या सुमारास गाडी बुटीबोरी ते गुमगाव दरम्यान आली असताना अचानक जितेंद्र धावत्या गाडीतून खाली पडला. ही बाब लक्षात येताच प्रवाशांनी चेन ओढून गाडी थांबवली. गंभीर जखमी झालेल्या जितेंद्रला गार्डच्या व्हॅनमध्ये ठेवण्यात आले. गार्डने ही माहिती नागपूर लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे डॉक्टरला दिली. त्यानुसार, गाडी नागपुरात येताच रेल्वे डॉक्टरने गार्डच्या डब्यात असलेल्या जितेंद्रची तपासणी केली. मात्र, वेळ झाली होती. जितेंद्रचे प्राणपाखरू उडून गेले होते.

> ■ **काय करावे, कसे करावे?**
>
> रोजगाराच्या शोधात सोबत निघालेल्या चुलतभावाचा अशा पद्धतीने अंत झाल्याने विक्रमसिंगला जोरदार मानसिक धक्का बसला आहे. काय करावे, कसे करावे? असे प्रश्न त्याला पडले आहे. अत्यंत हलाखीची स्थिती असल्याने जितेंद्रच्या कुटुंबीयांना इकडे येणे शक्य होणार नाही. त्यामुळे जितेंद्रचे शव तिकडे कसे न्यावे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वे पोलिस या संबंधाने चौकशी करीत आहेत.

# अकोल्यात पश्चिम विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाल्यास वंचित लढणार

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अकोला :** – अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त असल्याचे येथे पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. या ठिकाणी पोटनिवडणूक जाहीर झाल्यास वंचित आघाडीकडून उमेदवार देण्यात येणार आहे, अशी माहिती वंचित आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रवक्ता डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांनी मंगळवारी दिली.



भाजपचे ज्येष्ठ नेते तथा आमदार गोवर्धन शर्मा यांचे ३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यामुळे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली. ही रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक आयोगाकडून पोटनिवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने प्रशासनाने तयारी देखील केली. दरम्यान, ही निवडणूक जाहीर झाल्यास ती लढण्याची तयारी वंचित आघाडीने केली आहे. याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणीने घेतला. या संदर्भात उमेदवारी निवडीची प्रक्रिया लवकरच पूर्ण करून उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात येईल, असे पुंडकरांनी सांगितले.

# काँग्रेस नेते सुनील केदार यांची उच्च न्यायालयात धाव

## जामीन आणि शिक्षा स्थगितीसाठी धडपड

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :**

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी (एनडीसीसी) बँकेतील १५३ कोटी रुपयांच्या घोटाळ्यात माजी मंत्री सुनील केदार यांना अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाचे पाच वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन फेटाळल्यावर आता त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यावर बुधवारी सुनावणी होणे अपेक्षित आहे.

त्यांनी सुरुवातीला सत्र न्यायालयात जामिनासाठी तसेच शिक्षा रद्द करण्यासाठी धाव घेतली होती. मात्र, या घोटाळ्याची व्याप्ती मोठी आहे. रिझर्व्ह बँक, नाबार्डचे अहवाल या खटल्यांमध्ये दाखले करण्यात आले आहेत. या घोटाळ्याने शेतकरी व गुंतवणूकदारांना मोठे नुकसान झाले असून, जामीन मिळाल्यास समाजात चुकीचा संदेश जाईल, असे नमूद करीत अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने त्यांचा जामीनअर्ज तसेच शिक्षेला स्थगिती देण्याचा अर्ज फेटाळला होता. यामुळे आता त्यांनी त्यांचे वकील देवेंद्र चौहान यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाल घेतली आहे.

इतरांच्या जामिनावर उद्या सुनावणी

एनडीसीसी बँक घोटाळा प्रकरणात दोषी आढळल्याने २२ डिसेंबरला न्यायालयाने



केदार यांच्यासह सहा जणांना पाच वर्षांचा सश्रम कारावास आणि १२ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. सर्वच आरोपींनी जामिनासाठी अर्ज केला होता. केदारांशिवाय अन्य आरोपींनी दंडाची रक्कम जमा केली नाही. त्यामुळे केवळ केदार यांच्याच अर्जावर सुनावणी झाली होती. आता इतरांच्या जामिनावर सत्र न्यायालयात गुरुवारी सुनावणी होणे अपेक्षित आहे.

### सरकारतर्फे विशेष वकील?

या खटल्याच्या दरम्यान राज्य सरकारतर्फे नाशीकचे जिल्हा सरकारी वकील अभय मिसार यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. केदारांच्या सत्र न्यायालयातील जामिनाच्या सुनावणीतसुद्धा त्यांनीच बाजू मांडली. उच्च न्यायालयातसुद्धा विशेष वकिलाची नियुक्ती करण्याची शक्यता आहे. राज्य सरकारकडून वरिष्ठ अधिवक्त्यालाच विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्त केले जाऊ शकते, अशीही माहिती शक्यता आहे.

# बुलढाण्यात इंधनाचा राखीव साठा ठेवण्याचे आदेश

## जिल्हा प्रशासन 'अलर्ट मोड' वर



### १११ पम्प फुल्ल

जिल्ह्यातील पेट्रोल पंपांची संख्या १११ आहे. संपाची माहिती मिळताच जिल्ह्यातील लाखो लहान, मध्यम वाहनधारकांनी सोमवारी( दि.१) रात्रीच पंपासमोर रांगा लावल्या.मध्यरात्री पर्यंत या रांगा कायम राहिल्या. आज मंगळवारी सकाळी देखील हेच चित्र होते. बहुतेक वाहन धारकांनी 'टँक फुल्ल' करण्यावर भर दिल्याने एरवी सहा दिवस चालणारा इंधन साठा दोन तीन दिवसातच संपणार असे मजेदार चित्र आहे. संप कायम राहिला तर मात्र हेच चित्र गंभीर होणार हे उघड आहे.

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा –** वाहतुकरांच्या संपामुळे होऊ शकणारा इंधनाचा तुटवडा लक्षात घेता जिल्हा प्रशासन 'अलर्ट मोड'वर आले आहे. जिल्ह्यातील शेकडो पेट्रोल पंपावरील इंधन साठा राखीव ठेवण्याचे आदेश बजावण्यात आले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी वीणा बसय्ये यांनी सोबत बोलताना ही महत्वपूर्ण माहिती दिली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुकदारांचा संप व त्याच्या संभाव्य परिणामांचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर जिल्ह्यातील आरोग्य सेवा, अन्नधान्य वाहतूक आदी अत्यावश्यक सेवांसाठी पेट्रोप पंपात राखीव इंधन साठा ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.यासंदर्भात जिल्ह्यातील १३ तहसीलदाराना आवश्यक त्या सूचना,निर्देश देण्यात आल्याचे 'डीएसओ' वीणा बसय्ये यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील विविध कंपन्यांच्या १११ पेट्रोल पंपातील ठराविक साठा राखीव ठेवण्यात येणार आहे. संपाचा अत्यावश्यक सेवेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.जिल्हा पुरवठा अधिकारी वीणा बसय्ये यांनी बोलता ना ही महत्वपूर्ण माहिती दिली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुकदारां चा संप व त्याच्या संभाव्य परिणामां चा आढावा घेण्यात आला.

# लोकसभा जिंकण्यासाठी भाजपचा 'राम कदम' पॅटर्न

## घाटकोपरचा सुपरहिट फॉर्म्युला देशभरात वापरणार

दि.३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई १७

मंदिर वही बनाएंगे... भाजपनं कित्येक वर्षांपासून दिलेली घोषणा आता प्रत्यक्षात उतरतेय. २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिरात प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होईल. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपचे दिग्गज नेते उपस्थित असतील. या सोहळ्याच्या माध्यमातून भाजप लोकसभा निवडणुकीचं बिगुल फुंकेल असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. कारण राम मंदिर हा भाजपसाठी कित्येक वर्षे अस्मितेचा प्रश्न राहिला आहे. तीन तलाक, कलम ३७० पाठोपाठ भाजपनं त्यांच्या अजेंड्यावरील आणखी एक आश्वासन पूर्ण केलं आहे.

भाजप, संघाच्या मंदिर वही बनाएंगेला विरोधकांकडून आधी जोरदार प्रत्युत्तर दिलं जायचं. मंदिर वही बनाएंगे, पर तारीख नहीं बताएंगे अशा शब्दांत विरोधक भाजपला टोला हाणायचे. पण आता राम मंदिराचं लोकार्पण अवघ्या काही दिवसांवर आलं आहे. राम मंदिराचं आश्वासन पूर्ण केल्याचा मुद्दा भाजप लोकसभा निवडणुकीत वापरेल. त्यासाठीची व्यूहनीती आखण्यात आली आहे. एप्रिलपर्यंत देशातील दोन ते तीन कोटी लोकांना अयोध्येतील राम मंदिराचं दर्शन घडवण्याचा भाजपचा मानस आहे. तशी तयारी भाजपनं सुरु केली आहे.राम मंदिराचं दर्शन घडवण्यासाठी भाजपनं मायक्रो मॅनेजमेंट सुरू केलं आहे. अनेक ठिकाणी अक्षत कलश यात्रा काढल्या जात आहेत. गावागावांमध्ये अध्यात्मिक कार्यक्रमांचं आयोजन सुरू करण्यात आलं आहे. २२ जानेवारीला अयोध्येत प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर पुढील दोन ते अडीच महिन्यात दोन ते तीन कोटी लोकांना राम मंदिराचं दर्शन घडवण्याची भाजपची योजना आहे. यासाठी लोकसभेच्या प्रत्येक मतदारसंघातून किमान पाच हजार जणांना राम मंदिर दर्शनासाठी नेण्यात येईल.



### राम मंदिरासाठी राम कदमांचा पॅटर्न

सर्वप्रथम महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून विधानसभेवर गेलेले राम कदम यांनी त्यांच्या मतदारसंघातील हजारो मतदारांना आतापर्यंत काशी, केदारनाथ अशी तीर्थस्थळं पाहण्यासाठी नेलं आहे. याचा मोठा फायदा त्यांना निवडणुकीत झाला. घाटकोपर पश्चिम विधानसभा मतदारसंघातून ते सलग तीनवेळा आमदार झाले. २००९ मध्ये त्यांनी मनसेच्या तिकिटावर निवडणूक लढवली. ते पहिल्यांदा आमदार झाले. त्यानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. २०१४ आणि २०१९ मध्ये ते भाजपच्या तिकिटावर विजयी झाले.

# लोकसभा निवडणुकीचे पडघम!

## लोकसभेसाठी शिंदे गट मैदानात; शिवसंकल्प अभियानातून शक्तीप्रदर्शन

दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती १२

लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. त्याअनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेची ताकद दाखविण्यासाठी राज्यात शिवसंकल्प अभियानाची घोषणा केली आहे. या अभियानाची सुरवात ६ जानेवारी पासून होत असून १३ व २० जानेवारी रोजी पश्चिम विदर्भात शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे.

आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुका जिंकण्यासाठी व पक्षात नवचैतन्य प्रस्थापित करण्यासाठी शिवसेना शिंदे गट शिवसंकल्प अभियानाच्या माध्यमातून मैदानात उतरत आहे. राज्यात महायुती आणि मविआ च्यावतीने मोर्चेबांधणीवर भर दिला जात आहे. त्यातच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसंकल्प अभियानची घोषणा केली असून या अभियानची सुरवात पहिल्या टप्यात ६ जानेवारीपासून सुरु होत असून पश्चिम विदर्भात हे अभियान १३ जानेवारी पासून राबविण्यात येत आहे. हे अभियान १३ जानेवारी रोजी अमरावती आणि बुलडाणा तर २० जानेवारी रोजी यवतमाळ वाशीम लोकसभा मतदार संघात आयोजित करण्यात आले आहे. या दरम्यान भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात आले आहे. शिवसंकल्प अभियान ऐन लोकसभा निवडणुकीच्या



तोंडावर राबविण्यात येत असून या अभियानच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहिर सभा देखील होणार असून हे अभियान यशस्वी करण्यासाठी शिवसेना शिंदे गटाकडून नियोजन केले जात आहे. सरकारने घेतलेले निर्णय, विकासात्मक कामे व जनकल्याणकारी योजना घराघरात पोहचवून आगामी काळात होणार असलेल्या लोकसभा निवडणुका ताकतीने लढण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे. शिवसंकल्प अभियान पश्चिम विदर्भात किती प्रभावी ठरणार, हे लवकरच समोर येणार असले तरी कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

# धनगर आरक्षणाबाबत आजपासून

## हायकोर्टात अंतिम सुनावणी

**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** धनगर आरक्षणा बाबत आजपासून हायकोर्टात सुनावणी होणार आहे. राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करावे या मागणीसाठी हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. त्याच याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात आजपासून (३ जानेवारी) अंतिम सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत. तर, धनगर समाजाला आरक्षण मिळेल




आणि निकाल आमच्याच बाजूने लागेल असा विश्वास भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी व्यक्त केला.

शासन दरबारी धनगड अशी नोंद असून, राज्यातील धनगर हे धनगड नसून धनगर आहेत. त्यामुळे धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करावे या मागणीसाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. यावर आजपासून अंतिम सुनावणी होणार आहे. त्यामुळे ही सुनावणी महत्वाची समजली जात आहे. सध्या राज्यातील धनगर समाजाला ओबीसीचे राजकीय आरक्षण असून, धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे म्हणजेच एसटीचे आरक्षण देण्याची मागणी होत आहे.

### अनेक राज्यात धनगर समाजाला ST आरक्षण

राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करून एसटीचे आरक्षण देण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जाता असून, यासाठी धनगर समाज लढा देत आहे. सध्या राज्यातील धनगर समाजाला ओबीसीचे राजकीय आरक्षण असले तरीही देशातील अनेक राज्यात मात्र धनगर समाजाला एसटीचे आरक्षण आहे. राज्यातील धनगड आणि धनगर या शब्दामुळे आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित असल्याचे बोलले जाते. राज्यातील धनगर समाजी शासकीय दरबारी धनगड नोंद असल्याने त्यांना धनगर समाजाचे आरक्षण मिळत नसल्याचे बोलले जाते. त्यामुळे इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील धनगर समाजाला देखील अनुसूचित जमातीचे म्हणजेच एसटीचे आरक्षण देण्याची मागणी अनेक वर्षांपासून राज्यातील धनगर समाज करत आहेत. दरम्यान आता हे प्रकरण न्यायालयात जाऊन पोहचले असून, या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याच याचिकेवर आजपासून अंतिम सुनावणी होणार असून, याकडे राज्यातील धनगर समाजाचे लक्ष लागले आहेत.

# 'भाजपमध्ये कोण- कोण जाणार? नावे जाहीर करावी...'

## अशोक चव्हाणांचे विखे पाटलांना आव्हान

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नांदेड १५** देशाच्या तसेच राज्याच्या राजकारणात लोकसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात वार- पलटवार अन् आरोप प्रत्यारोपांचे सत्र सुरू असल्याचे दिसत आहे. लोकसभा निवडणुकीआधी काँग्रेसमधील अनेक भाजपमध्ये येण्यास इच्छुक असल्याचा दावा राधाकृष्ण विखे- पाटील यांनी केला होता. विखे पाटलांच्या या दाव्यावर काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी प्रत्यूत्तर दिले आहे.काँग्रेसमधील अनेक जण भाजपात येण्यासाठी इच्छुक



असल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले होते. विखे पाटील यांच्या या विधानावर अशोक चव्हाण यांनी उत्तर दिले असून भाजपाच्या संपर्कात कोण कोण आहेत त्यांची नावे जाहीर करावी, असं गुपीत ठेऊ नये... असा टोला अशोक चव्हाण यांनी लगावला आहे.महाविकास आघाडीच्या जागा वाटपासंदर्भात काँगेसच्या केंद्रिय समितीने आमची मत जाऊन घेतली. केंद्रिय समीती जे निर्देश देईल त्या अनुषंगाने तिन्ही पक्षाशी चर्चा करुन, मित्र पक्षांना सोबत घेऊन निर्णय अपेक्षित असल्याचे अशोक चव्हाण म्हणाले. तसेच महाविकास आघाडी आणि मित्र पक्षांना सोबत सोबत घेण्याविषयी मतभेद नाहीत, जागा वाटपात मार्ग निघेल याची खात्री असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.अशोक चव्हाण भाजपात आले तरीही लोकसभेची निवडणूक मीच लढवनार असा दावा नांदेडचे भाजपाचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केला. माझा पक्ष आणि मोदीसाहेब सोबत आहेत त्यामुळे मला कोणीही हरवू शकत नाही, असा विश्वासही चिखलीकरांनी व्यक्त केला होता. यावर बोलताना अशोक चव्हाण यांना मी कश्याला घाबरायचं, त्यांना उत्तर द्यायच नाही. ती मोठी मानस आहेत.. असा टोला लगावला.

# सीएम अरविंद केजरीवाल आजही ईडीसमोर हजर होणार नाहीत

## अटक करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आम आदमी चा आरोप

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक नवीदिल्ली –** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पुन्हा एकदा ईडीचे समन्स आले आहे, मद्य घोटाळा प्रकरमी ईडीने समन्स दिले आहे. दरम्यान, आज मुख्यमंत्री केजरीवाल ईडीसमोर हजर राहाणार नाहीत. केजरीवाल आपले उत्तर पाठवले आहे. यावर आता आम आदमी पक्षाकडूनही प्रतिक्रिया आली आहे. 'मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल ईडीच्या तपासात सहकार्य करण्यास तयार आहेत, पण तपास यंत्रणेची नोटीस बेकायदेशीर आहे. अरविंद केजरीवाल यांना अटक करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचे आम आदमी पक्षाचे म्हणणे आहे.

केजरीवाल यांना निवडणूक प्रचारापासून रोखण्याचे प्रयत्न सुरू आहेत. निवडणुकीपूर्वी नोटीस बजावण्यावरही 'आप'ने प्रश्न उपस्थित केले आहेत. दिल्ली मद्य धोरणातील कथित घोटाळ्याप्रकरणी ईडीने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ३ जानेवारीला हजर राहण्यासाठी तिसरी नोटीस बजावली होती. यापूर्वी दोनदा नोटीस मिळाल्यानंतरही ते



ईडीसमोर हजर झाले नव्हते. आता केजरीवाल तिसऱ्यांदा ईडीसमोर हजर झाले नाहीत. यापूर्वीही अरविंद केजरीवाल यांनी ईडीने पाठवलेल्या दोन समन्सबाबत लेखी उत्तर पाठवून प्रश्न उपस्थित केले होते. समन्स बेकायदेशीर आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत त्यांनी चौकशीत भाग घेतला नाही.

यापूर्वी, ईडीने केजरीवाल यांना २ नोव्हेंबर आणि २१ डिसेंबर २०२३ रोजी हजर राहण्यासाठी समन्स पाठवले होते. मात्र तो तपास यंत्रणेसमोर हजर झाले नाहीत. दिल्लीतील आम आदमी पक्षाचे निमंत्रक अरविंद केजरीवाल यांना दुसरे समन्स पाठवण्यात आले तेव्हा ते विपश्यना ध्यानासाठी पंजाबला गेले होते. तिसऱ्या समन्सवरही दिल्लीचे मुख्यमंत्री हजर झाले नाहीत तर ते अडचणीत येऊ शकतात. वरिष्ठ वकील गीता लुथरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रक्रिया अशी आहे की ईडीच्या समन्सवर हजर न झाल्यास जामीनपात्र वॉरंट जारी केले जाते आणि त्यानंतरही हजर न झाल्यास अजामीनपात्र वॉरंट जारी केले जाते. त्यानंतरही व्यक्ती हजर न झाल्यास अटक करण्याची तरतूद आहे.

# क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले आधुनिक भारताच्या भाग्यविधात्या : किशोर बोरकर



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

तात्कालीन परिस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सोबत देशांतील महिलांच्या शोषणा विरूद्ध व महिलांना सुध्दा समान संधी आणि त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी प्रस्थापित ,जात्यांध शक्तीचा विरोध पत्करून महिलांना शिक्षणाची संधी भारतात सर्वप्रथम क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी करवुन दिली असून सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच आज देशातील महिलांना सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याची संधी उपलब्ध झाली आहे, आज आपला भारत देश जगातल्या बलाढ्य देशाच्या रांगेत आला असून यामध्ये देशातील महिलांचा मोठा सहभाग राहिला आहे, म्हणूनच सावित्रीबाई फुले या आधुनिक भारताच्या भाग्यविधात्या आहेत.असे विचार स्थानिक संत गाडगे महाराज विद्यालय नवाथे नगर अमरावती येथील शाळेत, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती दिनी आयोजित समारंभात महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी व्यक्त केले,ते पुढे म्हणाले की, तात्कालीन कालखंडात मुलींना शिक्षण घेण्याची मुभा नव्हती,अशा परिस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून, स्त्रीयांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सावित्रीबाई फुले यांना जोडलं,१ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात देशात मुलींची पहिली शाळा सुरू केली,त्यांनंतर ४ वर्षातच १८, शाळा सुरू करून भारताच्या प्रथम मुख्याध्यापिका होण्याचा प्राप्त केला,१८५२ मध्ये सरकारने उत्कृष्ट शिक्षिका म्हणून त्यांचा सन्मान केला.एवढं उत्तुंग कार्य क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे असल्याचे किशोर बोरकर यांनी याप्रसंगी सांगितले.याप्रसंगी मुख्याध्यापक किशोर बन्सोड, सौ.वसुंधरा बोरकर,प्रा.राजेश दाभाडे, प्रा.सुधीर ठाकरे, प्रा.केवटी, सौ.साधना राउत, सौ.कळंबे, सौ.लायदे ,सौ.पाटील, सौ.रामटेके, श्री.विनय बारब्दे व सौ.काळे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.भाग्यश्री रामेकर यांनी केले.

# उद्या स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

## विविध क्षेत्रातील मान्यवरांची राहणार उपस्थिती

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा गुरुवार दि. ४ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी आर्थिक निकषांवर आधारित आरक्षण देशहिताचे आहे या विषयावर ही स्पर्धा रंगणार आहे. ४ जानेवारी २०२४ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी १०:३० वाजता या स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेच्या उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभाला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, अपंग व कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आ. बच्चू कडू, माजी मंत्री आ.यशोमती ठाकूर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतील. या स्पर्धेचे फेसबुक, युट्यूब च्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. स्पर्धेत विजेता संघाला स्व.माणिकराव घवळे स्मृती फिरता चषक प्रदान करण्यात येईल.



विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल बाजूस मते मांडणाऱ्या दोन स्पर्धाचा संघ स्पर्धेसाठी पात्र ठेल. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्यास ११००१ रु. रोख,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय ७००१ रु.रोख सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व तृतीय पारितोषिक ५००१ रु. रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तसेच प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून २००१ रु व १५०१ रु रोख व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे हे २२ वे वर्ष असून, स्पर्धेच्या माध्यमातून महत्वपूर्ण विषयावर मत मांडण्याची संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. विदर्भ,मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र येथील नावाजलेले वादविवादपटू या स्पर्धेचे परीक्षण करणार आहेत.ही स्पर्धा निःशुल्क असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख ,संयोजक प्रफुल्ल घवळे व आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# धारणीच्या ४५ गावांसाठी ९.१६ कोटी

## खासदार नवनित राणा यांच्या प्रयत्नाला यश

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी तत्पर खासदार नवनित रवी राणा यांच्या प्रयत्नाला मोठे यश आले आहे. प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास योजना या केंद्रीय योजनेंतर्गत सन २०२१- २२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी बहुल मेलघाट च्या धारणी तालुक्यातील एकूण ४५ गावाच्या विकासासाठी तब्बल ९ कोटी १६ लक्ष रुपये मंजुर करण्यात आले आहे. या प्रकारे खासदार नवनित राणा यांनी धारणी तालुक्यातील ४५ गावांना नविन वर्षाचे जणूकाही गिफ्ट दिले आहे. या निधीतून ४५ गावांना आदर्श गाव करण्यात मदत होणार आहे.अमरावती लोकसभा मतदारसंघात खासदार नवनित रवी राणा यांचे धारणी तालुक्यातील प्रत्येक गावात मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत.प्रत्येक आदिवासी लोकाचे जीवनमान उंचावण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यशस्वी रित्या मेलघाट मध्ये झाली पाहिजे, या करिता खासदार नवनित रवी राणा सतत धडपड सुरू राहते. यामुळेच त्यांच्या प्रयत्नातून केंद्र शासन पुरस्कृत योजनांतर्गत ९ कोटी १६ लक्ष रुपयांची निधी मंजुर झाली आहे. नविन वर्षात त्यांनी ४५



गावांना आदर्श गाव बनविण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

**काय आहे योजना**

अनुसूचित जमातीच्या लोकसंख्या असलेल्या गावांचा आदर्श गाव संकल्पनेवर आधारित एकात्मिक आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी आदि आदर्श ग्राम विकास ही योजना सुरू करण्याचा निर्णय घेऊन संदर्भ १ येथील पत्रान्वये केंद्र शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. योजनेच्या अंमलबजावणी करिता राज्यस्तरावरील आस्थापनांमध्ये स्पष्टता राहण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारच्या सुचनांच्या आधारे मार्गदर्शक सुचनांचा शासन निर्णय संदर्भ २ अन्वये निर्गमित केला आहे. सदर योजना सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालवधीकरिता राबविणेत येणार आहे. या करिता केंद्र शासनाने३६०५ गावे निवडली असुन दरवर्षी एक पंचमअंश गावांना अंदाजे रु. २०.३८ लक्ष इतका निधी प्रति गाव एकवेळ उपलब्ध करुन देणेत येणार आहे.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी सदर योजनेकरिता संदर्भ ३ येथील पत्रान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यक्षेत्राकरिता राज्य शासनास प्रस्ताव सादर केले होते. सदर प्रस्ताव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेने संदर्भ ४ येथील पत्रान्वये केंद्र शासनास सादर केले होते. प्रकरणी जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या प्रकल्प मुल्यमापन समितीची ऑनलाईन बैठक दिनांक १४ मार्च २०२३ रोजी पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त जनजाती कार्य मंत्रालयाने संदर्भ ५ येथील पत्रान्वये निर्गमित केले असुन, त्यान्वये राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या गावांपैकी १५४२ गावांचे ग्राम विकास आराखडे मंजुर केल्याचे कळविले आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेला निधी संदर्भ ६ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करणेत आला आहे. आता, ग्रामविकास आराखड्यातील कामांना प्रशासकीय मान्यता देऊन प्रत्यक्ष प्रस्तावित निधीच्या अनुषंगाने प्राप्त निधीच्या प्रमाणात रु. ४०२.८२ लक्ष इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

# मर्चंट बँकेसह पाच पतसंस्थेची ३ फेब्रुवारीला निवडणूक

## उपनिबंधक कार्यालयाकडून कार्यक्रम जाहीर नामांकन स्विकारण्याची प्रक्रिया सुरू

**दि३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दि अमरावती मर्चेंट को ऑफ, लि बँकेसह पाच पतसंस्थेचा निवडणुक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. याकरीता मंगळवारपासुन नामांकन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ३ फेब्रुवारीला मतदान तर ४ ला मतमोजणी होणार आहे. त्यामुळे मर्चट बँकेसह या पाच पंतसंस्थेतील पदाधिकारी सक्रिय झाले आहे. दि. अमरावती मर्चेंट को ऑफ, लि बँकेतील संचालक मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने बँकेतील मतदारांना देखील निवडणुकीची प्रतिक्षा लागली होती. अखेर उपनिबंधक कार्यालयाकडून सोमवारी कार्यक्रम घोषित होताच मंगळवारपासुन नामांकन स्विकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बँकेत १५ संचालक पदाकरीता ही निवडणुक होवु घातली आहे. सोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था, संत गजानन नगरी पतसंस्था वरूड, वस्तु सेवाकर कर्मचारी




पतसंस्था, अमरावती विभागीय शिक्षक, शिक्षकेत्तरकर्मचारी पतसंस्था अमरावती व सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेचा यामध्ये समावशे आहे. याकरीता ८ जानेवारी पर्यंत नामांकन स्विकारले जाणार आहे.९ प्राप्त अर्जाची छाननी केली जाईल. १० ला निवडणुक लढणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाईल. तर २४ जानेवारीपर्यंत नामांकनमागेघेण्याला मुदतदिली जाणार आहे. २५ लाचिन्ह वाटपानंतर ३ फेब्रुवारीला मतदान आणि ४ ला मतमोजणी होईल.

# १३ फेब्रुवारीपासून महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे बेमुदत उपोषण : संदीप शिंदेंनी दिला इशारा

**दि३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शासन पातळीवर ११ सप्टेंबररोजी बैठकीत मान्य झालेल्या मागण्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, राज्य परिवहन कर्मचाऱ्यांचे बाराशे कोटी थकबाकी आहे, यासह मागण्यांची पूर्तता करण्यात यावी, अन्यथा १३ फेब्रुवारीपासून महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी श्रमिक पत्रकार भवन येथे पत्र परिषदेत दिला आहे.

गुणवंत सदावर्ते यांनी एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन हायजॅक केले होते. ते संघटनेला लागलेल ग्रहण होतं. त्यांनी आपली राजकीय पोळी शकुन घेतली असून त्यांच्या आंदोलनाचे दुरगामी परिणाम दिसून येत असल्याचा आरोप संदीप शिंदे यांनी केला आहे.

राज्य परिवहन कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत राज्य परिवहन कामगारांना ४२% महागाई भत्ता लागू करण्यात आलेला आहे. तसेच महागाई भत्त्याची, घरभाडे भत्त्याची, व वार्षिक वेतन वाढीची वाढीव दराची थकबाकी देण्याबाबत १५ दिवसांत मुख्यमंत्र्यांनी, अर्थमंत्री यांच्या उपस्थितीत संघटनेच्या बैठकीत निर्णय घेण्याचे मान्य केले होते.

मात्र ६० दिवसांचा कालावधी होऊनही अद्याप मान्य केले नसल्याचे शिंदे यांनी सांगितले.सन २०१६-२० च्या कामगार करारासाठी शासन प्रशासनाने एकतर्फी जाहीर केलेल्या ४८४९ कोटीमधील शिल्लक रकमेचे वाटप ५ हजार, ४ हजार, २ हजार ५०० रुपये मूळ वेतनात दिलेल्या वाढीमुळे व सेवा ज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेल्या विसंगती दूर करणे, राज्य परिवहन कामगारांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देनी, या मागण्यांवर संघटनेशी चर्चा करून शासनाला ६० दिवसात सादर करण्याचे मान्य करण्यात आले होते. याकरिता मुख्यमंत्र्यांची पाच वेळा तसेच ना. दादा भुसे यांची भेट घेतली मात्र ६० दिवसांचा कालावधी संपून गेला असतानाही अद्यापही बैठक बोलावण्यात आली

नाही. त्यामुळे कामगारामध्ये तीव्र असंतोष पसरला असल्यामुळेच सर्व प्रलंबित आर्थिक मागण्यांच्या पूर्ततेसाठी संघटना १३ फेब्रुवारीपासून राज्यातील सर्व विभागीय पातळीवर बेमुदत उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा संदीप शिंदे यांनी दिला आहे. पत्रपरिषदेला राहुल धार्मिक, मोहित देशमुख, असलम खान, शमी पठाण उपस्थित होते.






# हिम्मत असेल तर आमदार अपात्रतेचा निर्णय घ्या ॲड. यशोमती ठाकूर यांचे सरकारला आव्हान

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आमदार अपात्रता प्रकरणांमध्ये विद्यमान सरकार कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे धास्तावलेल्या सरकारने काँग्रेसला बदनाम करण्याचा डाव सुरू केला आहे. काँग्रेस फुटेल अशा कंड्या काही लोकांना हाताशी धरून पिकवल्या जात आहेत. मात्र जर सरकारची हिंमत असेल तर त्यांनी आमदार अपात्रता याचिकेवरचा निर्णय घेऊन दाखवावा, असे आव्हान काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि मंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी सरकारला दिले आहे.राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसनंतर आता काँग्रेस फुटीच्या उंबरठ्यावर आहे लवकरच काँग्रेस मधील एक मोठा गट फुटून बाहेर पडेल अशा कंड्या पिकवल्या जात आहेत. समाज माध्यमांवरील काही इन्फ्ल्यून्सर्सना हाताशी धरून अशा पद्धतीची वातावरण निर्मिती केली जात आहे. मात्र, प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे हे महायुतीच्या लक्षात आले आहे. त्यामुळेच महायुती मधील घटक पक्षांचे धाबे दणाणले आहे.



आतापर्यंत विविध खाजगी सर्वेक्षण संस्थांनी आगामी निवडणुकांबाबत केलेले अंदाज पाहता महायुतीची राज्यात पीछेहाट होताना दिसत आहे. त्यामुळे विरोधकांचे नैतिक खच्चीकरण करण्यासाठी अशा पद्धतीच्या कंड्या पिकवल्या जात आहेत वास्तविक निवडून येण्याची शक्यता आणि क्षमता असताना आपला पक्ष सोडून कोण जाईल हा साधा विचार सुद्धा अफवा पसरवणाऱ्यांच्या मनात येत नाही , अशी प्रतिक्रिया ड. ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सोबतच्या आमदारांच्या अपात्रतेबाबतचा जर निर्णय झाला तर महायुती सरकारच कोसळणार, याबाबत आता जनतेची ही खात्री झाली आहे. त्यामुळेच आमदार अपात्रतेबाबतचा निर्णय लांबवला जात आहे. जर सरकारची हिम्मत असेल आणि विधानसभा अध्यक्षांची सदसदविवेक बुद्धी जागी असेल तर त्यांनी आमदार अपात्रतेच्या याचीकेवरचा निर्णय घेऊन दाखवावा, कशासाठी आता वेळ काढताय? असा सवाल करीत आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी सरकारला आव्हान दिले आहे.

# विद्यापीठातील प्रादर्शिक कला विभागात व्याख्यान संपन्न

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रादर्शिक कला विभागात नुकतेच एकदिवसीय व्याख्यान संपन्न झाले. मंचावर अध्यक्षस्थानी विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी, महात्मा गांधी हिन्दी विश्वविद्यालयाच्या नाट्य विभागप्रमुख डॉ. सतीश पावडे, महिला महाविद्यालयाच्या संगीत विभागाचे डॉ. अंकुश गिरी व्याख्याते म्हणून उपस्थित होते.



डॉ.सतीश पावडे यांनी 'शिक्षण प्रणालीत रंगभूमीचा उपयोग' या विषयावर व्याख्यानातून शैक्षणिक कार्यात रंगभूमीचा उपयोग याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन समाधान केले. व्दितीय सत्रात डॉ. अंकुश गिरी यांनी 'संशोधन पद्धती' या विषयांवर व्याख्यानातून संशोधन पद्धतीचा सखोल आढावा घेतला व विद्याथ्र्यांना मार्गदर्शन केले.

प्रारंभी विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.दीपप्रज्वलनाने व्याख्यानाला सुरूवात करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. अमोल पानबुडे, आभार अमित राऊत यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद तसेच श्री. राजू इंगोले विद्यार्थी, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# महिला महाविद्यालय ( कनिष्ठ विभाग) येथे सरस्वती पूजन संपन्न

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्थानिक नूतन शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय अमरावती कनिष्ठ विभागातर्फे सरस्वती पूजनाचे आयोजन सोमवार दि. १ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयाच्या ऑडिटोरियम येथे करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही नवीन वर्षाचे स्वागत करण्याकरिता महिला महाविद्यालयातील विद्य १/२ पारंपरिक वेशभूषा करून सरस्वती मातेची पूजा, आरती करून आराधना केली व आपली परपरा जपण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या सहसचिव प्रा. ममता पांडे यावेळी उपस्थित होत्या. तसेच कनिष्ठ विभागा च्या परिवेक्षिका प्रा. मंजिरी वळसे मॅडम आणि प्रा. माधुरी सोनपरोते यासुद्धा व्यासपीठावर उपस्थित होत्या. कनिष्ठ विभागाच्या वाणिज्य विभागाकडून प्रा. अपर्णा तीनखेडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मंगल सोहळ्याची सुरुवात सरस्वती मातेचे पूजन तथा दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनाने झाली.



यावेळी सामूहिक रित्या देवीची आरती सुद्धा विद्यार्थिनींकडून करण्यात आली. बारावी कला शाखेची विद्यार्थिनी प्रतिका कांडलकर हिने सुमधुर असे सरस्वती स्तवन सादर केले. तसेच बारावी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनी प्रगती गेडाम आणि चंचल फरकाडे यांनी प्रार्थना सादर केली तर प्रगती खराडे हिने अप्रतिम नृत्य सादर केले. मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर विद्यार्थिनींकरिता काव्य वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या नवीनतम उपक्रमाद्वारे विद्यार्थिनींना मराठी भाषेची गोडी लागावी, तसेच विविध मान्यवर कवींच्या कविता माहिती व्हाव्यात आणि त्याचा प्रसार व्हावा तसेच विद्यार्थिनींना त्याचा आस्वाद घेता यावा हा या कार्यक्रमामागील मूळ उद्देश होता. कनिष्ठ विभागातील कला, वाणिज्य, विज्ञान या तीनही शाखेतील विद्यार्थिनींनी यात भरघोस सहभाग घेतला व विविध प्रकारच्या कविता सादर केल्या ज्याला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कु. तृप्ती वायरे, भूमिका निंभोरकर, आरती यादगिरे, प्रतिका कांडलकर, कोमल पांढुरकर, चंचल साखरकर आणि सायली बोबडे या विद्यार्थिनींचे कविता सादरिकरण विशेष उल्लेखनीय होते. यावेळी प्रा. मंजिरी वळसे तसेच प्रा. अपर्णा तीनखेडे यांनीही स्वरचित कविता सादर केल्या. अध्यक्षीय भाषणात प्रा. ममता पांडे यांनी विद्यार्थिनींचे या उपक्रमाबद्दल कौतुक केले आणि नवीन वर्षाच्याशुभेच्छा सुद्धा दिल्या. या कार्यक्रमाचे सुंदर संचालन बारावी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या भाकरे व अश्विनी कुंभलवार हयांनी तर आभार प्रदर्शन संस्कृती शिरसाट यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कु. प्रतीका कांडलकर हिच्या मधुर गाण्यांनी झाली. कार्यक्रमाकरिता कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी इंग्रजी विभागाच्या 'स्पेक्ट्रम ' या वॉल मॅगझिनचे सुद्धा उद्घाटन प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील सर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनीही याप्रसंगी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले तसेच नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सचिव श्री. निनाद सोमण यांनीही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले तसेच नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

# नवनीत राणा प्रहारच्या तिकीटावर लोकसभा लढविणार?
# बच्चू कडूंनी विधानसभेचेही पत्ते उघडले

**दि.३विदर्भ प्रजसत्ताक अमरावती**

सध्या आम्ही कोणाच्याही बाजुने नाही आहोत. आमच्या पक्षाला राजकीय ताकद जिथून मिळेल त्याचा आम्ही विचार करणार. अमरावतीची लोकसभेची जागा आम्हाला हवी आहे. त्यावरून भूमिका ठरवू, असा इशारा ठाकरे सरकारमधील माजी मंत्री आणि सध्या शिंदे गटासोबत असलेल्या बच्चू कडू यांनी दिला आहे. याचबरोबर त्यांनी खासदार नवनीत राणा यांच्याबाबत वक्तव्य केले आहे.



महायुतीत अमरावतीची जागा आम्हाला हवी आहे, असे सांगताना नवनीत राणा यांनी हवे तर प्रहारच्या तिकीटावर अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी. अकोला, अमरावतीसह तीन जागा आम्हाला हव्या आहेत, असे कडू म्हणाले. यावर राणांकडून काय प्रतिक्रिया येते याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

याचबरोबर कडू यांनी विधानसभा निवडणुकीसाठीही जागा वाटपाचे पत्ते उघड केले आहेत. लोकसभेला ३ आणि विधानसभेला १५ जागांवर लढणार आहोत. येत्या १५ जानेवारीनंतर बैठक घेऊन पुढील भुमिका मांडू असे कडू यांनी म्हटले आहे.

शेतकऱ्यांच्या मुलांसोबत लग्न करणे म्हणजे आगीत उडी घेतल्यासारखे झाले आहे. शिपायाला, हॉटेलमध्ये काम करणाऱ्यांना मुली देतात. पण शेतकऱ्याच्या मुलाला मुलगी देत नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पॅकेज देऊन काही उपयोग नाही, कायमस्वरुपी तोडगा हवाय. या साऱ्याला सरकार जबाबदार आहे, असा आरोपही कडू यांनी शिंदे सरकारवर केला आहे.

# '...तर बच्चू कडू यांना विधानसभा निवडणुकीत मदत करू'; रवी राणा यांनी लोकसभेवरुन बजावले

## बच्चू कडूंच्या विधानावर आता अपक्ष आमदार रवी राणांची प्रतिक्रिया

**दि.३विदर्भ प्रजसत्ताक अमरावती**

सध्या आम्ही कोणाच्याही बाजुने नाही आहोत. आमच्या पक्षाला राजकीय ताकद जिथून मिळेल त्याचा आम्ही विचार करणार, असल्याचं ठाकरे सरकारमधील माजी मंत्री आणि सध्या शिंदे गटासोबत असलेल्या बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. बच्चू कडू यांच्या या विधानामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.



### विधानसभेला १५ जागांवर लढणार – बच्चू कडू

लोकसभेला ३ आणि विधानसभेला १५ जागांवर लढणार आहोत. येत्या १५ जानेवारीनंतर बैठक घेऊन पुढील भुमिका मांडू असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या मुलांसोबत लग्न करणे म्हणजे आगीत उडी घेतल्यासारखे झाले आहे. शिपायाला, हॉटेलमध्ये काम करणाऱ्यांना मुली देतात. पण शेतकऱ्याच्या मुलाला मुलगी देत नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पॅकेज देऊन काही उपयोग नाही, कायमस्वरुपी तोडगा हवाय. या साऱ्याला सरकार जबाबदार आहे, असा आरोपही कडू यांनी शिंदे सरकारवर केला आहे.

महायुतीत अमरावतीची जागा आम्हाला हवी आहे, असे सांगताना अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी हवे तर प्रहारच्या तिकीटावर अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी. अकोला, अमरावतीसह तीन जागा आम्हाला हव्या आहेत, असे बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. बच्चू कडूंच्या या विधानावर आता अपक्ष आमदार रवी राणा यांनी अमरावतीत माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे.

बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेचे एकमेव आमदार वेगळ्या वाटेवर, कारण त्यांना प्रहारवर विजयी होणार याची शाश्वती नाही, असा टोला रवी राणा यांनी लगावला आहे. तसेच बच्चू कडू महायुती धर्म पाळावा लागेल. लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांना बच्चू कडू यांनी मदत केली. तर बच्चू कडू यांना विधानसभा निवडणुकीत मदत करू, असं सांगत लोकसभा निवडणुकीत बच्चू कडू यांनी राजकारण केल्यास त्याचे परिणाम होतील, असा इशारा देखील रवी राणा यांनी दिला आहे.

# अखेर कारागृह विभागाच्या भरतीचा मुहूर्त निघाला, २५५ पदांची जाहिरात प्रसिद्ध

**दि.३विदर्भ प्रजसत्ताक अमरावती :**

राज्याच्या कारागृह विभागात सुमारे दोन हजार नवीन पदांना गतवर्षी मंजुरी मिळाली होती. मात्र आता नवीन वर्षात पदभरतीचा मुहूर्त निघाला असून, १ जानेवारीला २५५ पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यात लिपिक, वरिष्ठ लिपिक, लघुलेखक निम्न तसेच तांत्रिक संवर्गातील पदांचा समावेश असल्याने बेरोजगार युवकांना दिलासा मानला जात आहे.



कारागृह विभागात प्रशासकीय आणि तांत्रिक सेवेमधील पदांसाठी hhtp:// www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. १ ते २१ जानेवारी २०२४ या दरम्यान ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा लागणार आहे.

तसेच परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर परीक्षांची तारीख, वेळ आणि परीक्षा केंद्र, अटी, शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण, वयोमर्यादा, निवड पद्धत, सर्वसाधारण सूचना आदी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे.

**या पदांसाठी होणार भरती**

लिपिक – १२५, वरिष्ठ लिपिक – ३१, लघुलेखक निम्न श्रेणी – ४, मिश्रक– २७, शिक्षक –१२, शिवणकाम निदेशक –१०, सुतारकाम निदेशक– १०, प्रयोगशाळा तंत्रज्ञ– ८, बेकरी निदेशक – ४, ताणाकार– ६, विणकाम निदेशक– २, चर्मकला निदेशक– २ तसेच निटींग अँन्ड विव्हिंग निदेशक, करवत्या, लोहारकाम निदेशक, कातारी, गृह पर्यवेक्षक, लोहारकाम निदेशक, पंजा व गालीचा निदेशक, ब्रेललिपपि निदेशक, जोडारी, प्रिप्रेटरी, मिलिंग पर्यवेक्षक, शारीरिक कवायत निदेशक, शारीरिक शिक्षक असे प्रत्येकी एक असे एकूण २५५ पदे भरती केली जाणार आहे.

# तुषार भारतीय यांच्या प्रयत्नांना यश शिवसृष्टीच्या निर्मितीला सुरवात

**दि.३विदर्भ प्रजासत्ताकअमरावती**

अमरावती मनपाच्या अंतर्गत शिवटेकडी वर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनपटावर शिवसृष्टी निर्माण व्हावी या करिता भाजप नेते माजी सभापती तुषार भारतीय यांनी अथक प्रयत्न केले.मा देवेन्द्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना व यवतमाळ चे आमदार तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री श्री मदन येरावार यांनी तुषार भारतीय यांच्या मागणीला प्रतिसाद देऊन मुंबई मंत्रालयात बैठक घेऊन ३ कोटींचा निधी मन्जुर केला.या डीपीआर मध्ये छत्रपती ीहळुरक्षळ महाराज यांच्या जीवनपटावर आधारित महत्वाच्या घटनांचे म्युरल तसेच त्या घटनांची माहिती.लाईट इफेकट .महाराजांच्या जीवनावर लेझर शो.कारंजे इत्यादींचा समावेश आहे. या शिवसृष्टी च्या निर्मितीने शाळेच्या सहली,पर्यटक च्या दृष्टीने महत्वाचे ठरणार आहे. भाजपा नेते तुषार भारतीय यांचे अमरावती कर जनता अभिनंदन करते आहे



# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील उद्याला अमरावतीत

**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील हे उद्या, दि. ४ जानेवारी २०२४ रोजी अमरावती जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे:

गुरुवार, दि. ४ जानेवारी रोजी सकाळी ७.५५ वाजता अमरावती रेल्वेस्थानक येथे आगमन व सकाळी ८ वाजता रेल्वेस्थानकाहून वाहनाने शासकीय विश्रामगृह, अमरावतीकडे प्रयाण. सकाळी ८.१५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी ९.१५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून वाहनाने रिध्दपूर, ता. मोर्शीकडे प्रयाण. सकाळी १० वाजता रिध्दपूर येथे आगमन व नियोजित मराठी भाषा विद्यापीठ येथील थीम पार्क पाहणी व अन्य कार्यक्रमांसाठी राखीव. दुपारी १२ वाजता रिध्दपूर येथून वाहनाने अमरावतीकडे प्रयाण.



दुपारी १ वाजता सायन्सकोर मैदान, बस स्टॅण्ड रोड, अमरावती येथे आगमन व जिल्हा वार्षिक योजना निधीतून जिल्हा परिषद व माविम या यंत्रणेने विकसित केलेल्या 'मेळघाट हाट' या इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थिती. दुपारी २.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा वार्षिक योजना–आदिवासी, सर्वसाधारण, अनु. जाती उपयोजनाअंतर्गत राज्य व जिल्हा परिषदस्तरीय प्रमुख कार्यान्वयन यंत्रणांचा सन २०२२–२३ व २०२३–२४ च्या विकास कामांच्या बैठकीस उपस्थित राहतील.

दुपारी ४.१० वाजता मालटेकडी येथे आगमन व अमरावती महानगर पालिका अंतर्गत प्रादेशिक पर्यटन निधीतून मंजूर शिवसृष्टी प्रकल्पाच्या भूमीपूजन समारंभास उपस्थिती. सोईनुसार शासकीय विश्रामगृह, अमरावतीकडे प्रयाण व राखीव. सायं. ६.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून वाहनाने अमरावती रेल्वेस्थानकाकडे प्रयाण. सायं. ७ वाजता रेल्वे स्थानक येथे आगमन व राखीव. सायं. ७.१० वाजता अमरावती एक्सप्रेसने मुंबईकडे प्रयाण करतील.

# शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव द्या; शेतकरीच देशाला पुरून उरेल : विक्रम ठाकरे

## वरुडात कापूस व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे तहसील कार्यालयासमोर तब्बल एक ते दीड तास चक्काजाम आंदोलन



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक वरुड**

संत्रा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी विक्रम ठाकरे मित्र परिवार व समस्त कापूस व संत्रा उत्पादक शेतकरी वरुड व मोर्शी तालुका द्वारा आज दिनांक ३ जानेवारी २०२३ ला वरुड तहसिल कार्यालयासमोर, मुलताई चौक, वरूड येथे चक्क एक ते दीड तास चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते. संत्रा रोडवर फेकून व टायर जाळून शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला, यावेळी सरकार व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात नारेबाजी करत शेतकऱ्यांनी चक्काजाम आंदोलनात आपल्या मागण्या रेटून धरण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. चक्काजाम आंदोलनानंतर सदर मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदयांना तहसीलदार वरुड यांचेमार्फत पाठविण्यात आले.

वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती मागील काही वर्षांपासुन वातावरणाच्या बदलामुळे आणि लोप्रतिनिधीचया अकार्यक्षमतेमुळे डबगाईस आलेली आहे. शेतीतुन उत्पन्न झालेल्या मालाला उचित भाव शासनातर्फे न मिळाल्यामुळे प्रचंड नुकसान शेतकरी बांधवांच होत आहे. शेती उत्पादनाच्या अयमित किमतीमुळे शेतकरी पुरता हैरान झालेला आहे. त्यातच तालुक्यात संत्रा प्रक्रिया प्रकल्प अस्तित्वात नसल्याने करोडो रूपयाच्या संत्रा मालाचे आर्थिक नुकसान शेतकऱ्यांना भोगावे लागत आहे.

वरुड व मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी संत्रा उत्पादकांना हेक्टरी १ लाख रूपये अनुदान मिळावे तसेच संत्रा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळावा यासाठी हे चक्काजाम आंदोलन असून शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळाला तर हा शेतकरीच देशाला पुरून उरेल असे मत वरुड पंचायत समितीचे माजी सभापती ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केले. जनतेने शेतकरी पुत्र निवडून दिला पण शेतकरी अडचणी शासन दरबारी मांडण्यात अपयशी असून फक्त कागदावार चे निधी व संत्रा प्रकल्प आणल्याचे सोंग करतात. करिता शेतकरी हित लक्षात घेता एक संत्रा प्रक्रिया प्रकल्प वरुड तालुक्यात त्वरित सुरु करावा अशी मागणी सुद्धा विक्रम ठाकरे यांनी यावेळी केली. चक्काजाम आंदोलनानंतर सदर मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदयांना तहसीलदार वरुड यांचेमार्फत पाठविण्यात आले.संत्रा रोडवर फेकून व टायर जाळून केला शेतकऱ्यांनी यावेळी सरकारचा निषेध केला. सदर चक्काजाम आंदोलन हे वरुड तहसील कार्यालयासमोर मुलताई चौक येथे तब्बल एक ते दीड तास चालले. विक्रम ठाकरे सह शेकडो शेतकऱ्यांवर यावेळी गुन्हे दाखल करण्यात आले. यावेळी वरुड व मोर्शी तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# अतिक्रमण विभाग अंतर्गत अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

माननीय आयुक्त देविदास पवार यांच्या आदेशाने बुधवार रोजी अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, योगेश कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा रेल्वे स्टेशन परिसर येथे अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली असून मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले. तसेच ६ ट्रक साहित्य जप्त करण्यात आले. सदर ठिकाणी रोडच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. तसेच अतिक्रमणधारकांना सूचना देण्यात आल्या वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास दैनंदिन कारवाई सुरू राहणार. सदर कार्यवाहीत अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.


